म. ग्रं. सं. ठाणें

विषय

संग्रहालय क्रमांक

लेखक राजाराम रामकृष्ण भागवत

सन १८९२

पुस्तकाचें नांव संभाजीचें चरित्र.

५८५

चरित्र

~~ग्र १०८~~

~~पृ ३०~~

लेखक:

राजाराम रामकृष्ण भागवत

शके १८१४, सन १८९२

# संभाजीचें चरित्र.

१–शिवाजीच्या अकालिक मृत्यूनंतरची ताजी हकीकत. २–शहाजादा अकबर आश्रय मागण्यासाठीं छत्रपतीकडेस येतो. ३–शहाजादा अकबर आला तेव्हां रायगडीं झालेली नवी खटपट. ४–रघुनाथपंत हणमंते संभाजीस भेटावयास येतात. ५–आमच्या मंडळाची त्या काळची स्थिती. ६–कलुषा येतो व कुल् कारभारी होतो. ७–संभाजीनें केलेला फिरंग्यांचा मोड. ८–संभाजीचे कित्येक गुणावगुण. ९–रामच्या गडकऱ्यांची मर्दुमकी. १०–कोंकणांत पाठविलेल्या बादशाही लश्कराची स्थिति. ११–कुतुबशाहीचा कुल् कारभारी मादण्णा याचा वध. १२–अवरंगझेब व शाहाअलम हे पितापुत्र. १३–अदिलशाही बुडते. १४–वांईची लढाई व हंबीररावांचा मृत्यु. १५–मोगल कुतुबशाही बुडवितात. १६–संभाजीच्या सैरांवैरांची गटकळया. १७–संभाजीचा शेवट.

## १–शिवाजीच्या अकालिक मृत्यूनंतरची ताजी हकीकत.

शिवाजी निज धामास गेला, तेव्हां संभाजी पन्हाळ्याच्या किल्ल्यांत जनार्दनपंत हणमंते यांच्या नजरेखालीं होता. त्यामुळें शिवाजीची क्रिया राजारामाचे हातून घडली. शिवाजीस अभिषेक होण्याचे पूर्वीच संभाजीची आई सईबाई निवर्तली होती. तेव्हां शिवाजीचे अंतकाळीं त्याच्या हयात असलेल्या कर्त्या बायकांपैकीं राजारामाची आई सोयराबाईच संनिध असण्याचा संभव होता व ती तशी होतीही.

राजाराम मनमिळाऊ असून संभाजीचे दुर्गुण त्याचे आंगीं नव्हते. शिवाय सोयराबाईचें वजन शिवाजीजवळ विशेष असून, राजारामावर अधिक प्रेम असणें साहजिक होय. शिवाजीचें अकाळीं प्रयाण झालें तसें न होतें, तर प्रसंगीं शिवाजीनें पुढची व्यवस्था कशी केली असती, तें अनुमान करणें जोखिमाचें काम आहे. तरी बाकीची शिवाजीची वृत्ति व त्यानें काळगाड दिलेलाच्या ताब्यांत फिरंगोजीनें दिला तें ऐकून राज्यांतून फर्मावलेला हुकूम या दोहोंवरून विचार करितां, संभाजीस सुधरण्यास बराच अवकाश देऊन, तो जर न सुधरता तर केवळ मंडळाच्या कल्याणाकडेस

लक्ष पोंचवून, राजारामासच गादी देण्यास शिवाजी पाठीं पुढें न पहाता, असें ह्मणावें लागतें. संभाजीचा जन्म शके १५७९ ज्येष्ठ शुद्ध द्वादशी-चा असून, राजारामाचा शके १५८२ चैत्र शुद्ध नवमीचा होता. तेव्हां शिवाजीचे प्रयाणकाळीं संभाजी जवळ जवळ २३ वर्षांचा व राजाराम चांगला १९ वर्षांचा होता.

शिवाजीच्या कारकीर्दीचे अखेरीस, कर्तृत्व ज्यांच्यामध्यें विशेष व ज्यांच्यावर शिवाजीचा विश्वासही विशेष, असे अष्ट प्रधानांमध्यें मोरोपंत पेशवे, अण्णाजी दत्तो, जनार्दनपंत हणमंते व हंबीरराव मोहिते हे चौघे होते. दुर्दैवानें शिवाजीच्या शेवटच्या घडीस या चौघांपैकीं कोणीही जवळ नव्हता. मोरोपंत बागलाणांत किंवा खानदेशांत, अण्णाजीपंत कोंकणांत ह्मणजे ज्या मुलुखाचा कारभार शिवाजीनें त्यांस पहावयास सांगितला होता त्या मुलुखांत, जनार्दनपंत संभाजीवर डोळा ठेविण्यासाठीं पन्हाळा मुक्कामीं व हंबीरराव दळभारासहित **कऱ्हाडा** जवळ तळ देऊन सोंपविलेलें काम करण्यांत, मिळून चार दिशांस चौघे पडले होते. जर हे चौघे अखेरच्या प्रसंगीं शिवाजीचे जवळ असते किंवा हंबीरराव मोहिते तरी असते, तर अत्युत्तम होतें. पण तसें न होतां एकटी सोयराबाई जवळ पडली. तिच्याजवळ "राजारामास आपल्या पश्चात् राज्य मिळाल्यास बरें" अशा अर्थाचा उद्गार काढणें वर लिहिलेल्या कारणांमुळें साहजिक होय. असल्या स्थळीं सोयराबाईस कावा करण्याची कांहीं जरूरी दिसत नाहीं. सोयराबाई कावेबाज होती, असें ह्मणण्यासच पाहिल्यानें पुरावा नाहीं. ती जरी कावेबाज होती असें क्षणभर कबूल केलें, तरी शिवाजी बाइलबुद्धी होता किंवा कोणत्याही राजकी प्रकरणांत तो आपल्या बायकांची मसलत घेई, असें समजण्यास सवड नाहीं. जेव्हां शिवाजीच्या आंतल्या ज्योतिस्तत्त्वाचा बाहेरील पंच भूतांमध्यें लय झाल्याचा भास झाला, तेव्हां प्रल्हाद निराजी व रामचंद्र नीळकंठ हे दोघेही पुढें आमच्या मंडळाचे सर्वसह खांब झालेले कारकून साक्षी होते. साक्षाद् दुसरें हृदय बनून

काळासारख्या अवरंगझेबाच्या जबड्यांतून शिवाजी अक्षतशरीर सुटण्यास पुष्कळ अंशीं कारण झालेला हिरोजी फर्जंद व शिवाजीच्या चरणारविंदीं भ्रमराप्रमाणें लीन राहिलेल्या सिंहगडावरील सिंहाचा सख्खा नामांकित बंधु सुर्याजी मालुसरा, हे दोघेही हुजरे शिवाजीच्या महायात्रेच्या प्रस्थानाच्या समयीं सावलीप्रमाणें देहास न सोडतां होते. अप्रतिहत व मुद्देसूद लेखणीचा अधिकारी ह्मणून नांवाजलेला व शिवाजीच्या पायांजवळ रहाण्यासाठीं हातीं आलेल्या प्रधानकीवरही पाणी सोडणारा बाळ प्रभु चिटणीसही या विषम प्रसंगीं हजर होताच. इतकी शिवाजीची अगदीं अंतरंग झालेली मंडळी बिछान्याजवळ बसलेली असतां, कावा करण्यास सोयराबाईची छातीच होणें नाहीं. जरी चौघे प्रधान नव्हते, तरी ही जी मंडळी अंतकाळीं विद्यमान होती, ती निःसंशय यःकश्चित् नव्हती. प्रसंगीं या मंडळीस शिवाजीचें हृद्गत समजण्याचा जितका संभव होता, तितका वरील प्रधानांच्या चौकडीस नव्हता; कारण या मंडळीचा जितका खासगी प्रसंग शिवाजीशीं असे तितकाच दर्बारी प्रसंग वरील चौकडीचा होता. कित्येक गोष्टी खासगी प्रसंगानेंच कळण्याचा संभव अधिक असतो आणि त्या तशा दर्बारी प्रसंगानें कळण्याचा संभव फारसा नसतो. तशांत शिवाजीची क्रियाही राजारामाचे हातून झाली होती. तेव्हां शिवाजीच्या पश्चात् चांगला एक महिना गेल्यानंतर वैशाख वद्य तृतीयेस सर्वांनीं मसलतीअंतीं एके विचारानें राजारामास गादी दिली, ती गोष्ट कोणत्याही प्रकारें शिवाजीमहाराजांच्या इच्छेविरुद्ध झाली किंवा केवळ सोयराबाईनें केलेल्या काव्यामुळें झाली, असें समजण्यास आधार नाहीं.

जी चूक ह्मणून झाली ती इतकीच कीं हंबीररावांस लगेच पत्र पाठवून मसलतींत घेणें या मंडळीच्या हातून झालें नाहीं. राजारामास गादी मिळाल्याचीं पत्रें जशीं इतर प्रधानांस तशींच हंबीररावांसही पाठविण्यांत आलीं होतीं. पण एक अतर्कित गोष्ट घडून आली; व तीमुळें अगदीं जपून ठेविलेलें मसलतीचें भांडें एकाएकीं उपडी होऊन ठेवणाऱ्या

मंडळीपैकीं प्रत्येकास फूल ना फुलाची पांकळी संभाजीकडून सादर करण्यांत आली.

शिवाजी निवर्तल्याची बातमी संभाजीस कळूं नये ह्मणून मंडळीनें आपणाकडून बरींच सावधगिरी ठेवून, नजर अधिक सक्त करण्यास जनार्दनपंतांस पत्रेंही पाठविलीं होतीं. मोरोपंत वगैरे कारकून मंडळी येऊन पोंचली, तीही मसलतीस अनुकूळ होती. मंत्र षट्कर्ण झाला, तरी फुटतो. पण येथें तर षट्कर्णच नव्हे, तर तो शतकर्ण किंवा सहस्रकर्णही झाला ह्मटल्यास शोभेल. तेव्हां बाप निवर्तल्याची बातमी जर संभाजीस कळली, तर त्यांत नवल नाहीं. प्रसंगीं शत्रूंस मुळींच विचार करूं न देण्याचा किंवा विचार करून बंदोबस्त करण्यास सवड तरी सांपडूं न देण्याचा जो एक विलक्षण गुण शिवाजीचे आंगीं होता, तो संभाजीच्या आंगीं बराच उतरलेला दिसतो. शिवाजी निवर्तल्याची बातमी कळतांच, पहिल्यानें संभाजीनें जनार्दनपंतांच्या पायांत बेड्या ठोकिल्या. शिवाजीचा मुलगा ह्मणून संभाजीचा वचक थोडा होताच. तशांत वृत्तिही बरीच कडक असून स्वारी नेटानें काम उरकून घेणारी पडली. त्यामुळें लोकही त्याच्या सभोंवतीं बरेच जमले. अशा प्रसंगीं संभाजीच्या दुधांत साखर पडली व महाराष्ट्र मंडळाचा थरकांप झाला. संभाजीनें सपाट्यासरसें काम उरकल्यामुळें, शिवाजीची कळा बरीच आंगीं वसते असा भास झाला आणि हंबीररावांनीं फौजेनिशीं लगेच पाय धरिले. लागलाच संभाजी निघाला, तो रायगडीं आला. मोरोपंत व अण्णाजी या उभयतांस कैद करून, सांवत वगैरे प्रतिकूळ लोक होते त्यांचीं डोकीं मारण्यास व सोनाजी नाईक नांवाचा एक शिवाजीचा अतिविश्वासू हुजऱ्या जनार्दनपंताबरोबर पहारा करण्यासाठीं होता त्याचा मुलगा तावडीस सांपडला त्यास टकमकीवरून लोटून देण्यास संभाजीनें हुकूम केला. नंतर "विषप्रयोग करून राज्यलोभास्तव महाराजांस मारिलें" असा आरोप ठेवून सोयराबाईस दोन दिवस अन्नाशिवाय ठेविलें, व

तिसरे दिवशीं प्राण गेला, हें ऐकून राजारामाजवळून तिची क्रिया करविली. आषाढ शुद्ध द्वितीयेस याप्रमाणें रायगडीं येऊन संभाजीनें बंदोबस्त केला, व नंतर मंडळांत पत्रें वगैरे पाठवून श्रावण शुद्ध पंचमीस शिवाजीच्या गादीचें आक्रमण केलें. पुढें माघ शुद्ध १०मीस संभाजीस राज्याभिषेक झाला. ज्या दिवशीं राज्याभिषेक झाला त्या दिवशीं "सूर्यदर्शन झालें नाहीं" व "काळपुरुष मारावा ह्मणून" महाराज "निघाले तों मार्गीं रथ मोडला."

---

## २–शहाजादा अकबर आश्रय मागण्यासाठीं छत्रपतीकडेस येतो.

सुमारें शालिवाहन शके १६०० पासून रजपुतांस आपल्या अंमलखालीं आणण्याच्या उद्देशानें अवरंगझेब राजस्थानांत राहिला होता. मारवाड व उदेपुर हीं दोन राज्यें स्वाहा करण्याचा अवरंगझेबाचा मानस होता. मारवाडचा राजा जसवंतसिंग काबूल मुक्कामीं सुभेदार पाठविला होता, तो तिकडेसच वारला. तेव्हां अर्ध्याहून अधिक काम झालेंसें दिल्लीपतीस वाटलें. जसवंताचा मुलगा अजित याची सुंता करण्याचा आग्रह अवरंगझेबानें धरिला. त्यामुळें जसवंताची विधवा मुलास घेऊन आपल्या मुलखीं येत असतां, वाटेवर तीस मनस्वी त्रास झाला. तरी रजपूतांच्या शौर्यानें व दुर्गादासाच्या शहाणपणानें ती मुलासहित आपल्या मुलखीं येऊन सुरक्षित पोंचली. जरी उघडा मुलूख अवरंगझेबाच्या कबजांत अनायासें आला, तरी डोंगराळ मुलुखांत त्याचे फार हाल झाले. सवड सांपडतांच रजपूत वर तुटून पडत व जशीं बकऱ्यांचीं तशीं मोगलांचीं मुंडकीं उडवीत. मेवाडांतही असेच हाल होऊं लागले. तेव्हां अझिम व अकबर या दोन शहाजाद्यांस बोलावून, लश्कर त्यांच्या ताब्यांत दिलें; व देखरेख करण्यासाठीं खांसा दिल्लीपति अजमीर मुक्कामीं तळ देऊन राहिला. अझीमानें चितूर घेतलें, व दिल्लीपतीनें देवळें दिसलीं तीं मोडून मशिदी केल्या. तेव्हां तर रजपूत अगदीं कजेलीस आले.

अशा आणीबाणीच्या प्रसंगीं ज्यांचा धीर खचत नाहीं व स्वधर्माचा त्याग करून भंगुर भोगांचा उपभोग ज्यांचे स्वप्नींही येत नाहीं त्यांसच "पुरुष" शब्द शोभतो व तसल्याच पुरुषांनीं आमची भूमाता "रत्नगर्भा" असें अन्वर्थक नांव पावली आहे. इतका खटाटोप केला असतांही तड लागत नाहीं, असें पाहून आपला दूधभाऊ खान जहान याची पुनः अवरंगाबादेस नेमणूक करून, तिकडून शहाजादा शहाअलम व दिलेलखान या दोघांस हुजूर बोलाविलें. पण शहाअलम हुजूर येऊन पोंचल्यानंतर अकबर बिथरला. अशा समयीं पादशहात बळकाविणें असल्यास आपण ३०,००० शूर रजपूत मदतीस पाठवितों, असा निरोप अकबरास जसवंतसिंगाच्या विधवेनें धाडिला. पण ज्या जोशास मुहूर्त पहाण्यास अकबरानें सांगितलें होतें, तो फुटला. त्यामुळें आलेल्या ३०,००० रजपूतांची चुकामूक करून त्यांच्या मनांत विकल्पही उत्पन्न करण्यास, अवरंगझेबास चांगली संधि सांपडली व अकबर एकटा पडला. लौकरच जसवंतसिंगाच्या विधवेस अकबर भेटला, तेव्हां सगळी कच्ची हकीकत तीस कळली व अकबराविषयीं आलेला विकल्प तिच्या व रजपूतांच्या मनांतून गेला. त्यामुळें रायगडीं छत्रपतीकडे जाण्याची मसलत रजपूतांनीं अकबरास दिली व तिकडे जाणें असल्यास दारुकदास राठोडास बरोबर देण्याचेंही पत्करलें. तेव्हां बायकामुलांस रजपुतांजवळ ठेवून दारुकदासानिशीं अकबर रायगडाकडेस वळला. आपल्या सुभेदारींतून शहाजादा पळत सुटला, हें समजतांच खानजहानानें पाठलाग करण्याचा यत्न केला. पण पाठलाग करतांना मजल मारतां आली तितकी मात्र पदरांत पडून, दुसरा कांहीं सांगण्यासारखा फायदा खानजहानास झाला नाहीं.

---

## ३—शहाजादा अकबर आल्यानंतर रायगडीं सुरु झालेली नवी खटपट.

अकबर रायगडीं येऊन पोंचला, तेव्हां संभाजी पन्हाळ्यास गेला होता.

अण्णाजी दत्तो वगैरे मंडळी शिवाजीच्या हांताखालीं कसलेली होती. या मंडळीस अकबर रायगडीं आल्यानें एक अपूर्व निधान हातीं लागल्यासारखें वाटलें. विचार करितांही हें एक खरोखरीच अपूर्व निधान आमच्या मंडळाच्या हातीं या काळीं लागलें होतें. पण योग न आल्यास ओढून आणणारा व आलेला योग कधींही वाऱ्या जाऊं न देणारा कोठें तो साक्षात् अवतार भासणारा शिवाजी व आलेले दरोबस्त योग घालविण्यांत वहादुरी मिळालेला कोठें सूर्याच्या पोटीं शनैश्चराप्रमाणें जन्मलेला हा संभाजी ! ! ! तेव्हां वरील कसलेल्या व योगैकदृष्टि कारकून मंडळीनें सोइराबाईच्या वधानें आंगाचा तिळपापड होणाऱ्या तिच्या आप्तांस हातीं धरून राजारामास गादी देण्याची जर खटपट पुनः चालविली, तर त्यांत सांगण्यासारखें नवल नाहीं. या खटपटीची खबर संभाजीस लागली, मग ती चिटणीस ह्मणतात त्याप्रमाणें महाडकर देशपांड्याकडून लागलेली असो किंवा "आर्म" ह्मणतो त्याप्रमाणें अकबराकडून लागलेली असो. पण ती त्यास निःसंशय लागली व त्यामुळें अण्णाजी दत्तो व बाळ प्रभु या दोन नामांकित व शिवाजीच्या अतिविश्वासू मुत्सद्दी पुरुषांस हत्तींच्या पायीं देण्याची सजा झाली. मोरोपंतासही पुढें कैदेंत दिवस काढावे लागले, त्याचें मुख्य कारण हीच खटपट होय.

---

## ४—रघुनाथपंत हणमंते संभाजीस भेटावयास येतात.

पुढें धोंडसें गांव अकबरास रहाण्यास मिळून, त्याचें नांव "पादशहापुर" असें ठेवण्यांत आलें.

दिवसें दिवस मंडळांत अंदाधुंदी माजत चालली, अशा समयीं रघुनाथपंत हणमंते—ज्यांस शिवाजीनें तंजावराहून परत येतांना संपूर्ण तिकडील मुजमु सांगितली होती ते—तिकडील मुलुखाचा खर्च जाऊन शिलकेंत पडलेले तीस चाळीस हजार होन घेऊन भेटावयास आले. त्यांनीं बिलकुल भीड न धरितां संभाजीजवळ मंडळांतील अंदाधुंदीविषयीं दिलगिरी उघड

प्रदर्शित केली. त्यांचा निर्भीडपणा व स्पष्टवक्तेपणा पाहून मि. ग्रांट डफ यांस आश्चर्य वाटतें. पण खरोखर पहातां त्यांत आश्चर्य वाटण्यासारखें कांहीं नाहीं. वांकड्या रस्त्यानें पाऊल टाकणाऱ्या वेंकाजीची—तो शिवाजीचा भाऊ असतां व शिवाजी जिवंत असतां—ज्यानें पर्वा केली नाहीं, तो रघुनाथपंत शिवाजीच्या पश्चात् शिवाजीच्या मंडळ बुडवूं पहाणाऱ्या मुलाची भीड ठेवील किंवा पर्वा राखील, असें कालत्रयीं होणें नाहीं. जशीं धर्मप्रकरणीं तशीं राज्यप्रकरणींही निर्भीड व स्पष्टवक्त्या ब्राह्मणांचीं उदाहरणें आमच्या मंडळांत तरी सहज देतां येतील. पूर्वीप्रमाणें एव्हांही राजकारण सिद्ध करून रघुनाथपंत आला असावा, पण "राज्याचा खर्च वाढला आहे" असा संभाजीनें उद्गार काढला, तेव्हां रघुनाथपंताची पुरी खात्री झाली कीं शिवाजीचें कर्तृत्व व शहाणपण हीं शिवाजीबरोबरच अस्तास गेलीं. पुढें चंदीस गेल्यानंतर किंवा जातांना वाटेंतच हा नामांकित मुत्सद्दी वारला.

---

## ५—आमच्या मंडळाची या काळची स्थिति.

रघुनाथपंत वारले, अण्णाजी दत्तो व बाळ प्रभु हत्तीच्या पायीं गेले, मोरोपंत व जर्नादनपंत नजर कैदेंत राहिले किंवा उदास होऊन विरक्तांप्रमाणें दिवस घालवूं लागले. सारांश, शिवाजीच्या वेळचे जे नांवाजलेले कर्ते कारकून होते व ज्यांनीं एकदा सोडून दहादा भररणांत तलवार गाजविली होती किंवा आपल्या बुद्धिबळानें शिवाजीसही थक्क करून सोडिलें होतें, त्या सर्वांची वाताहत झाली.

---

## ६—कलुषा येतो व कुल् कारभारी होतो.

अशा समयीं कलुषा नांवाचा कनोजा ब्राह्मण आपली रूपवती स्त्री घेऊन दक्षिणेंत आला होता, त्यास संभाजीकडून सेनापतीखेरीज दुसऱ्या प्रधानांचें काम करण्याचा अधिकार मिळाला. त्याच्या बायकोच्या रूपास संभाजी

भुललेला असो किंवा देवीनें प्रसन्न होऊन दिलेल्या वरामुळें तो संभाजी-च्या गळ्यांतील ताईत झालेला असो. पण कलुषा करील ती पूर्वदिशा, अशी संभाजीची स्थिति झाली. स्त्रियांचें व मद्याचें व्यसन संभाजीस होतेंच, तें कलुषाच्या संगतीनें दुणावलें. तशांत लौकरच राज्याचा भार आवरेनासा होऊन, इकडे थोडा तिकडे थोडा असा पांचसात ठिकाणीं मुलुख ठेविला हें शिवाजीनें शहाणपणाचें काम केलें नाहीं, असाही उद्गार कलुषानें काढिला. असला महामंत्री मिळाल्यानंतर आमच्या मंडळाच्या भाग्यास पारावार कोठून असणार!!! बुंदेलखंडाचा राजा छत्रसाल अवरंगझेबावर रुसून पदरीं रहाण्यास एकदा शिवाजीकडे आला होता. पण हिंदुस्थान्यास आपल्या पदरीं ठेवून त्याच्या हातीं मऱ्हाठ्यांच्या माना देणें शिवाजीस पसंत न पडल्यामुळें व अवरंगझेबाच्या काव्याचीही शंका आल्यामुळें, जरी अभ्यागताचा आदरसत्कार करण्यांत कांहीं कमी झालें नाहीं तरी कांहीं दिवसांनीं छत्रसालाची त्याच्या मुलुखीं शिवाजीकडून बोळवणी करण्यांत आली. हें शिवाजीचें शहाणपण. पण बापापेक्षां अधिक शहाणा मुलगा आपल्या दरोबस्त मंडळाचा भार एका एकट्या हिंदुस्थान्या-वर टाकतो!!!

---

## ७—संभाजीनें केलेला फिरंग्यांचा मोड.

हबश्याचें व मऱ्हाठ्यांचें वैमनस्य पूर्वीपासूनच होतें. या काळीं दादाजी रघुनाथ देशपांडे महाडकर यास संभाजीनें जंजिरेकरांवर पाठविलें. पण महाडकरास नामोहोरम करून, त्याचीं बायकामाणसें हातीं लागलीं, तीं-ही हबश्यानें गुलामांप्रमाणें विकून टाकलीं.

तेव्हां ३०,००० लष्कर बरोबर घेऊन खासा संभाजीनें चौलाकडेस स्वारी केली.

आपल्या मुलुखास संभाजीचा उपद्रव होऊं लागला असें पाहून १,२०० गोरे व २५,००० काळे घेऊन गोव्याचा गव्हर्नर संभाजीच्या

मुलुखांत शिरला; व हिंदूंचीं देवळें फोडीत व लोक बाटवीत चालला, तो फोंडच्या किल्ल्यास मोर्चे लावून बसला. अशा जंगी लष्करापुढें टिंकाव धरून रहाण्यापुरते लोक व ठाणीं फोंडच्या आसपास नाहींत असें पाहून ८,००० स्वार १४,००० प्यादे घेऊन संभाजी चौलाहून निघाला. फोंड मुक्कामीं येऊन पोंचल्यानंतर तीन ठिकाणीं फिरंग्यांनीं किल्ला फोडलेला संभाजीस आढळला. संभाजी जवळ येऊन ठेपला तरी, गोवाधिपतीनें धीर सोडिला नाहीं. अखेरीस मऱ्हाठ्यांनीं फिरंग्यांस जवळ जवळ वेढून टाकिलें. तेव्हां नाइलाज होऊन गवर्नरानें पाठीं पाऊल घेतलें. गोवें चांगलें तीस मैलांवर होतें. फिरंगी गोव्याकडेस हटत चालला, तसतसे मऱ्हाठेही पाठून दाबूं लागले. पहिला दिवस अस्तास जाण्याच्या पूर्वींच फिरंग्यांचें सरंजाम व तोफा मऱ्हाठ्यांच्या हातीं लागल्या. कुंभारजूं मुक्कामीं गवर्नर पोंचेपर्यंत, २०० गोरे व १,००० काळे जायां झाले. हा पाश्चात्यांशीं मऱ्हाठ्यांचा पहिलाच प्रसंग होय. ज्या मावळ्यांनीं व मऱ्हाठ्यांनीं शिवाजीचे वेळीं एकदा सोडून पांचदा नर्मदेच्या उत्तरेस शौर्यासाठीं नांवाजलेल्या मोंगलांस, पठाणांस व रजपुतांस भरसमरांत कापून काढिलें किंवा पाठ दाखविण्यास लाविलें, त्यांस पाश्चात्यांचा मोड करणें हें विशेष दुष्कर होतें, अशी कल्पना करण्यांत अर्थ नाहीं. तरी प्रसंग येऊन गेल्याशिवाय कस नीट समजत नाहीं, हें खरें आहे. मऱ्हाठ्यांचें पाणी कळून आल्यानंतर आणि कारंजेंही संभाजीनें घेतलें असें पाहून, इ० स० १६८४ चे सुमारास फिरंग्यांनीं सलुख्याचें बोलणें चालविलें.

---

## ८—संभाजीचे कित्येक गुणावगुण.

नेटानें काम करणें वगैरे जे लष्करी गुण शिवाजीमध्यें होते, ते संभाजीच्या आंगीं बरेच वसत होते. पण शिवाजीच्या आंगीं लष्करी गुणांप्रमाणें मुत्सद्दी गुणही होते, व संभाजीच्या आंगीं या प्रत्येक छत्रपतीस

अत्यावश्यक अशा मुत्सद्दी गुणांची "भागं नास्ति" स्थिति. संभाजीनें ९० लक्ष रुपये आपणांस रोख देण्याची पहिली शर्त सांगितली, ती फिरंग्यांस कबूल झाली नाहीं. इतका रोख ऐवज फिरंग्यांजवळून या काळीं निघण्यासारखा नव्हता. जर शिवाजीवर असा प्रसंग असता, तर धोरण ठेवून व सर्वतोमुख विचार करून, कांहीं ना कांहीं तोड निघती व मंडळाचें कल्याण होतें. पण शिवाजी पडला शिवाजी, व संभाजी पडला संभाजी. तह झाला नाहीं व पावसाळ्यानंतर हल्ला करून पुनः फिरंग्यांनीं कारंजें घेतलें. मऱ्हाठे बळी गेले ते फुकट बळी गेले, व पैसा खर्च झाला तो पाण्यांत पडून मंडळास काडीचाही फायदा झाला नाहीं.

"दोन पादशहातीशीं एकदम दावा करूं नये" असें शिवाजीचें शहाणपणानें ओतप्रोत भरलेलें एक ह्मणणें होतें. जेव्हां दिल्लीपतीशीं दावा असे, तेव्हां प्रायः विजापुरकरांशीं शिवाजीचा सलूखा असे; व विजापुरकरांशीं दावा करी, तेव्हां प्रायः दिल्लीपतीशीं शिवाजी सलुख्यानें वागे. पण संभाजीचें करणें शुद्ध उफराटें. संभाजीचा सलूखा प्रायः कोणाशीं नसून, जिकडे तिकडे दावा चाललेला असे व "फटाटोप" मात्र भयंकर दिसे. कारंजें घेतलें असें पाहून वसई प्रांत सर करण्याचा संभाजीनें पहिल्यानें आव घातला. पण मोंगल कल्याणाजवळ आले अशी खबर कळल्यामुळें, फिरंग्यांशीं दावा भिजत ठेवून संभाजीची स्वारी उत्तरेकडेस वळली.

---

## ९—रामसजच्या गडकऱ्यांची मर्दुमकी.

अकबरास पकडणें हातून झालें नाहीं ह्मणून इतराजी होऊन, दक्षिणच्या सुभा शहा अलमास पुनः दिल्लीपतीनें दिला व हुसेन अलीस कोंकणांत पाठविलें. पुढें लौकरच अजमीराहून अवरंगझेबाची स्वारी मऱ्हाठ्यांस समूळ बुडविण्यासाठीं ह्मणून अवरंगाबाद मुक्कामीं आली. दिलेलखानानिशीं शहा अलमची योजना अहमदनगरीं झाल्यानंतर, गुलसनाबादे-

हून ( हें नाशिकचें अविंधी नांव ) पांच कोसांवर रामसजच्या किल्ल्यासमोर मजल्यावर मजला उभारून मोगलांनीं एक सज्जा उठविला. कोणी गडकऱ्यानें डोकें वर केल्यास त्यास अचूक गोळीच्या टप्यांत आणण्यासाठीं हा सज्जा मोगलांकडून मुद्दाम किल्ल्याच्या उंचीचा बनविण्यांत आला होता. लौकरच दिल्लीपतीनें शाबुद्दीनास जुन्नरीं धाडून, खानजहानास रामसज सर करण्यासाठीं जाण्याचा हुकूम केला. खानजहानानें नेटानें हल्ला केला. पण दलपत बुंदेले वगैऱ्यांस जखमा लागून, कांहीं निष्पन्न झालें नाहीं. दोन तीन दिवसांनीं आणखीं एकदा हल्ला केला. पण तोही वायां गेला व आसपास मऱ्हाठे जोरावत चालले. तेव्हा मोठ्या दिमाखानें बांधलेला सज्जा जाळून टाकून, दाखविलेल्या नामर्दाईचा उपहास गडकऱ्यांकडून उघड चालला असतां, मोगल पाठीं हटले.

---

## १०—कोंकणांत पाठविलेल्या बादशाही लश्कराची स्थिति.

रोहिल्लाखानानिशीं रणमस्तखान कोंकणांतील किल्ले सर करण्यास आला. रायगडाहून खांसा स्वारी करून संभाजीनें रणमस्ताची रसद बंद केली व कही मारली. रणमस्त साफ बुडाला असता; पण जंजिऱ्याहून याकुदानें व घांटावरून रोहिल्ल्यानें कुमक धाडल्यामुळें, फारसें नुकसान न ग्वातां रणमस्तास परत जातां आलें. पुढें या दोहोंसही बोलावून, यांचे जागीं शहा अलम व मोअझ्झदीन या बापलेंकांची योजना झाली. हे दोघेही कामगिरी बजावीत असतां, कोंकणांत रोगाची सांथ उद्भवली. त्यामुळें बादशहाचे लोक पुष्कळ मेले व जे राहिले त्यांस दाणा मिळेना. अशा प्रसंगीं भडोचवर स्वारी करून संभाजीनें मोठी लूट आणिली. हवशी दाणा पुरवी तो पुरेना व बादशाही लोक उपाशीं मरूं लागले. ही हकीकत शहा अलमनें बापास कळविली. तेव्हां शहाजाद्यास हुजूर आणण्यासाठीं रोहिल्ल्यास पाठवून, अवरंगझेब खासा अहमदनगरीं आला.

---

## ११–कुतुबशाहाचा कुल् कारभारी मादण्णा याचा वध.

अहमदनगरीं भेट झाल्यानंतर, शहा अलमास दिल्लीपतीनें विजापुरच्या पश्चिमेकडील मुलुख सर करण्यास पाठविलें. अवरंगझेबाचा दुसरा मुलगा अझीमशहा विजापुरच्या उत्तरेकडील मुलुखांत होता, त्यानें सोलापुरचा किल्ला घेतला. शहा अलमनें गोकाक, हुबळी, धारवाड हे तीन किल्ले सर केले. धारवाडाहून शहा अलम गदग मुक्कामीं गेला. गदगहून विजापुर फक्त साठ मैलांवर रहातें. त्यामुळें विजापुरकरांनीं शहा अलमावर १५,००० स्वार रवाना केले. अझीम शहास बराच मार विजापुरकरांकडून बसल्यामुळें, मुलाच्या कुमकेसाठीं दिल्लीपति अहमदनगराहून सोलापुरीं आला व गोंवळकोंड्यावर जाण्यास गदग मुक्कामीं शहा अलमास फिर्मान धाडता झाला.

या समयीं खान जहान गोंवळकोंड्याच्या स्वारींत गुंतलेला होता. कुतुबशाहीचा कुल् कारभार या काळीं मादण्णापंत नांवाचा ब्राह्मण करीत होता. इब्राहिम नांवाच्या आविंधास मादण्णापंतानें कर्तृत्व बरेंच आंगीं दिसून आल्यामुळें पटापट वाढविलें होतें व त्याच्यावर मादण्णापंताचा पुष्कळ विश्वास होता. इब्राहिमाच्या आंगीं कर्तृत्व निःसंशय होतें; पण वरिष्ठ प्रतीचे गुण आंगीं नसल्यामुळें, त्याच्यावर पंताचा विश्वास होता तो अपात्रीं होता. इब्राहिम निमकहराम होऊन मोगलाकडेस वळला, व रक्ताचा थेंब पडल्याशिवाय शहा अलमच्या हातीं इब्राहिमासच सर्नोबती दिलेला हैदराबादचा किल्ला लागला.

तेव्हां मादण्णानें प्रसंगास अनुसरून वरंगूळच्या किंवा तसल्याच दूरच्या किल्ल्यांत रहाण्याची अत्युत्तम मसलत अबुहुसेनास दिली. पण दुर्दैवानें अबुहुसेनानें आपणास गोंवळकोंड्याच्याच किल्ल्यांत कोंडून घेतलें. अबुहुसेन आमच्या देशी बखरांत व गोष्टींत "तानशहा" किंवा "तानाशहा" या नांवानें नांवाजला आहे.

तानशहा हा स्वतः मोठा सालस व सज्जन होता. कारभार हातीं

टाकणारा आला. जर तह मोडावा, तर एका प्रकारचा विश्वासघात होतो, जर तो न मोडावा, तर बापाची मरेपर्यंत इतराजी होऊन कारागृह कपाळीं येतें. अशा विवंचनेंत शहा अलम पडला. जेव्हां आज्ञाभंग केल्यास कारागृहाची उघड धमकी अवरंगझेबानें दिली, तेव्हां शहा अलमचा मुलगा मोअझद्दीन जवळ होता. खऱ्या मार्गानें गेल्यास आपला बाप ऐहिक सुखास सर्वस्वीं मुकतो असें पाहून, मोअझद्दीननें लगेच तलवारीस हात घातला. "असला वाईट कित्ता आपल्या मुलांबाळांस घालून देणें बरोबर नाहीं" असा गंभीर उद्गार काढून झटदिशीं शहा अलमानें आपल्या मुलाच्या हातांतून तलवार हिसकावून घेतली. खरोखरीच हा प्रसंग असा होता कीं पितृद्रोहाची व भ्रातृवधाची आठवण होऊन अवरंगझेबाचे हातपाय अगदीं गळून जावे. पण वज्राच्या पलीकडेही जर एखादें उपमान कविप्रतिभा निर्माण करील, तरच अवरंगझेबाच्या हृदयाचें स्वरूप नीट निरूपण करितां येईल. मोअझद्दीनामुळें शहा अलमास पकडणें जड जाईल, हें अवरंगझेबानें ताडलें, व भागा नगरचा विषय सोडून देऊन दिल्लीस परत जाण्याचा घाट घातला. बापलेंकांस कोणत्याही प्रकारें संशय येऊं नये, ह्मणून संभाजीशीं सलूखा करण्याच्याही गोष्टी दिल्लीपतीनें झोडल्या. नंतर शहा अलम व मोअझद्दीन या दोघांस एकान्तीं ह्मणून एकदा बोलाविलें, व एका उमरावानें त्यांस येतांच कैद केलें. शहा अलमचा आणखीं एक मुलगा होता, त्यासही कैद करून अवरंगझेबानें तिघांस तीन निराळ्या किल्ल्यांत दिल्लीकडेस पाठविलें.

---

## १३—अदिलशाही बुडते.

गोंवळकोंडें मुक्कामीं शहा अलम असतां दिल्लीपतीनें अदिलशाही साफ बुडविण्याच्या हेतूनें छावणी सोलापुर मुक्कामाहून विजापुरापुढें पाठविली होती. पुढें बादशहा येऊन पोंचतांच तोफांची मारगिरी किल्ल्याच्या तटावर चालली. चौतर्फा मोगलांनीं घेरून टाकल्यामुळें दाणा मिळेनासा झाला.

व बुरूजही अनेक ठिकाणीं फुटल्यामुळें शिकंदर शरण आला. सर्जेखान व अबदुल राऊफ हे दोघे विजापुरकरांचे सर्दार फितूर झाले होते, त्यांस सात हजाऱ्या देऊन, सय्यद लश्कर नांवाचा सर्दार पदरीं होता त्यास अवरंगझेबानें विजापुरच्या किल्ल्याची सुभेदारी सांगितली व अदिलशाहीची समाप्ति केली.

अदिलशाहीचा कूटस्थ यूसफ हा मुळचा इस्तंबुलच्या सुल्तानाचा मुलगा होय. या यूसफनें इसवी सन १४८९ मध्यें अहंमद शहा बहिरीशीं मसलत करून विजापुरीं आपल्या नांवानें खुतबा वाचविला, व बेदरची ब्राह्मणशाही लौकरच अस्तास गेली. यूसफ स्वतः जरी शीया संप्रदायाचा होता, तरी "माझा धर्म मला व तुमचा धर्म तुह्मांस" असें हमेश ह्मणून तो धर्मसंबंधानें कोणाचाही छळ करीत नसे. यूसफाच्या मुलाचा मुलगा इब्राहिम गादीवर बसला, तेव्हां दफतराची भाषा मऱ्हाठी होऊन, सर्व जातींच्या मऱ्हाठ्यांस आश्रय देण्यांत आला. इसवी सन १५५७ त हा वारल्यानंतर, याचा मुलगा अल्ली गादीवर बसला. या अल्लीनें त्या वेळचा निझामशहा व कुतुबशहा यांच्याशीं मिलाफ करून विजयनगरकरांस बुडविलें. हा इसवी सन १५७९ त वारला, तेव्हां याचा पुतण्या इब्राहिम गादीवर बसला; कारण यास मुलगा नव्हता. नांवाजलेला इतिहासकार फिरिस्ता यास या इब्राहिमाचा आश्रय होता. ग्यासुद्दीन नांवाचा एक पंडित याचे दर्बारीं होता, त्याचा व याचा एकदा खालीं लिहिल्याप्रमाणें संवाद झाला.

इब्राहिम—मुसलमानांमध्यें उंच कोण? शीया कीं सुन्नी?

ग्यासुद्दीन—देव हा बादशहा आहे. पाहिजे त्या दर्वाजानें त्याच्याकडेस जावें.

इब्राहिम—उत्कृष्ट धर्म कोणता?

ग्यासुद्दीन—आपापल्या धर्मावर विश्वास ठेवून देवास भिऊन चालणारा मनुष्य जो धर्म पाळतो, तो धर्म उत्कृष्ट धर्म—असें मला वाटतें.

इब्राहिमाच्या कारकीर्दींत मोगलांनीं निजामशाही बुडविली. शिवाजीचा जन्म होण्याचे पूर्वी एक वर्ष इब्राहिम वारला. इब्राहिमाचा मुलगा महंमद व महंमदाचा मुलगा अल्ली. अल्लीचा मुलगा शिकंदर. या शिकंदरास कैद करून दिल्लीपतीनें विजापुरची सुल्तानत बुडविली.

---

## १४—वांईची लढाई व हंबीररावांचा मृत्यु.

विजापुर बुडविल्यानंतर मऱ्हाठ्यांस शासन करण्याचे कामीं सर्जेखानाची योजना दिल्लीपतीनें केली. सर्जेखान वांईपर्यंत आला. या मुक्कामीं हंबीरराव तळ देऊन होते. मऱ्हाठ्यांची व मोगलांची मोठी अरेतुरेची लढाई झाली. जर लढाईंत हंबीरराव खडे होते, तर मऱ्हाठ्यांची मोठी फत्ते झाली तींत आश्चर्य मानण्याजोगें कांहीं नाहीं. त्या वीर पुरुषाच्या सांनिध्यानें मोगलांस हार येऊन सरंजाम, घोडे वगैरे उमाप लूट मऱ्हाठ्यांस मिळाली. पण छत्रपतीच्या दुर्दैवानें याच लढाईंत गोळा लागून हंबीररावांसही वीरांची गति मिळाली. हंबीररावांचा पराभव ह्मणून कधीं झालेला नाहीं. जितक्या लढाया मारिल्या, त्या सर्वांत त्यांनीं फत्तेच मिळविली; व जितके वेळां लूट गोळा केली, तितके वेळां मोगलांस दाद न देतां, ती सुरक्षित आणून छत्रपतीच्या पायांवर टाकिली. हंबीररावांचा एकच बाणा तलवारबहादुरीचा होता. त्यामुळें शिवाजीच्या पश्चात् मोरोपंत वगैरे कारकून उदास झाल्यानंतर व अण्णाजी प्रभृति मंडळी हत्तीच्या पायीं गेल्यानंतर, आमच्या मंडळाचा व्हावा तसा फायदा हंबीररावांच्या उमद्या तलवारबहादुरीपासून झाला नाहीं, तेथें त्यांचा निरुपाय होता. तरी हंबीररावांचा शत्रूंस मोठा धाक पडलेला असल्यामुळें, संभाजीस पुष्कळ दिवस चैनबाजींत घालविण्यास सांपडले, यांत शंका नाहीं.

---

## १५—मोगल कुतुबशाही बुडवितात.

नंतर अवरंगझेबाची स्वारी "दिल्लीस जावयाचें, दिल्लीस जावयाचें"

असें पिकवीत कुलबुर्ग्याकडेस वळली. कुलबुर्गा किल्ला मजबूत असल्यामुळें, आंतील एका पिराच्या थडग्या जवळ जाऊन प्रार्थना करण्याची परवानगी अबुहुसेनाजवळ दिल्लीपतीनें मागितली. थोर मनानें परवानगी ही दिली, इतकेंच नाहीं, तर आणखीं पांच लक्ष मोहोरा धर्मार्थ वांटण्यासाठीं अवरंगझेबाकडेस अबुहुसेनानें रवाना केल्या. सर्पास जरी दूध घातलें, तरी गरळ ओकून अखेरीस दूध घालणारासच डसण्यासाठीं तो धांवायाचा. पीराचें दर्शन तर दिल्लीपतीनें घेतलें; पण लगेच गोंवळकोंड्याकडेस वळून, अझीमशहास आग्ऱ्याहून दाणा व लश्कर आणण्यास पाठविलें. पूर्वी फितूर झालेला इब्राहिम होताच. त्याची योजना वेढा घालण्याच्या कामीं दिल्लीपतीनें केली व आपली छावणी हैदराबाद मुक्कामीं ठेविली. ज्या चकमकी झडत त्यांत मोगलांचें वळेना. त्यामुळें धनाचा प्रयोग अझीमानें केला व रोहिल्यांचा किल्ल्यांत प्रवेश झाला. गडकऱ्यांनीं शर्थ केली. पण फितव्यामुळें लश्करावर लश्कर गडांत ओतत चाललें व गडकरी हतवीर्य झाले. अबुहुसेनास कैद करून अझीमशहानें अवरंगझेबाकडेस पाठविलें. अबुहुसेनाच्यां व त्याच्या बायकांच्या आंगावर जें जवाहीर आजून बाकी राहिलें तें सगळें आपल्या लोकांजवळून काढवून, एक किल्ला अबुहुसेनास रहाण्यास अवरंगझेबानें नेमून दिला व कुतुबशाहीची समाप्ति केली.

कुतुबशाहीची प्राणप्रतिष्ठा कुतुबुल्मुल्क या तुर्की गुलामानें इसवी सन १५१२ या सालीं केली. या वंशाची मुळची राजधानी गोंवळकोंडें. कुतुबापासून ४ था सुलतान कुली महंमद यानें गोंवळकोंड्याची हवा आपणास मानत नाहीं असें पाहून एक नवें शहर वसविलें, व त्यास आपल्या "भागा" नांवाच्या नाटकशाळेवरून "भागानगर" हें नांव पहिल्यानें दिलें. पुढें मुसलमान यासच "हैदराबाद" ह्मणूं लागले.

पुढें सुलतान अबदुल्ला याचे कारकीर्दींत शहाजहानानें कुतुबशाहींत पहिल्यानेंच हात घातला व बापाचे हुकुमानें अवरंगझेबानें हैदराबाद लुटून एक कोट रुपये घेऊन तह केला. अबदुल्लास मुलगा नव्हता, ह्मणून

त्याचा जांवई अबुहुसेन गादीवर बसला. याच्या कारकीर्दीत अव्यवस्था माजूं लागली. मादण्णास कारभार मिळाल्या दिवसापासून मात्र कांहीं व्यवस्थितपणा कुतुबशाहीस आला होता.

---

## १६–संभाजीच्या सैरांवैरां गटकळ्या.

छत्रपतीस एक शिवाजीसारखें धोरण असावें किंवा त्यांच्या हाताखालच्या परार्थ जन्मलेल्या मुत्सद्यांस तें असून छत्रपतीनें त्यांचें नीट ऐकावें तरी. संभाजी स्वतः धोरणाच्या गांवीं स्वप्नींही गेलेला नव्हता. जे धोरणी मुत्सद्दी होते, ते तर हत्तीच्या पायीं गेले किंवा विरक्त झाले. ज्यास कुल् कारभार मिळाला होता, तो अति शहाणा कलुषा पहिल्या प्रतीचा धोरण-शून्य होता. ठिकठिकाणीं अंतरा अंतरावर मुलुख पडल्यामुळें जम बसविणें जड जातें, इतका जाडा या कुल् कारभाऱ्याचा मुत्सद्दीपणा ! ! ! तशांत थोडें बहुत तरी लष्करी धोरण ठेवणारे हंबीरराव नुक्तेच गेले. जर शिवाजी हा महापुरुष या काळीं जिवंत असता, तर शहाजादा अकबर यास व राजस्थानांतील रजपुतांस हातीं धरून, पहिल्यानें कुतुबशाहीस नाभी-कार देता. शहाजादा अकबर हातीं व कुतुबशाही शिवाजीची आज्ञांकित, इतकें काम होतें, ह्मणजे दक्षिणेंत खांसा पाऊल टाकण्याचे पूर्वी दिल्लीपती-स एकदा सोडून दहादा नीट विचार करावा लागता. शिवाजीचा तो लोकोत्तर मुत्सद्दीपणा व हंबीररावांची शिवाजीनें सोंपविलेलें काम सुरेख करण्याची ती लोकोत्तर हातोटी या दोहोंची सांगड पडती, ह्मणजे आमचें मंडळ जसें अकुतोभय होतें, तसेंच शहाजहानाचें मयूरासन सर्वतोभय हो-ऊन कांपूं लागतें.

विजापुर बुडालें व कुतुबशाहीस बुडविण्यास गोंवळकोंड्याकडेस अव-रंगझेबाची स्वारी वळली, हें ऐकून संभाजी विजापुरकरांचें कर्नाटक सर करूं लागतो, व तिकडील गोंवळकोंडेकरांचा मुलुख सर करण्यासाठीं म्ह-णून चंदीच्या हरबाजी राजाकडेस केशवराव व संताजी घोरपडे यास

१२,००० स्वारांनिशीं बाहेरून म
हरजीसच कैद करून पकडण्याचे
गोवळकोंडें पडल्यानंतर अबुहुसे
यास "ऊबकरखान" या किता
मीरहुसेन नांवाचा एक उमराव अ
किताबानिशीं सहाहजारी व कांची
आली होती. हे दोघे दक्षिणेंत
हजर होतेच. हरजी व केशव
नक्की होण्याचे पूर्वीच बंगलूर मोग
म्हाळ्यांची दुक्कल म्हैसूर प्रांताकडे
पडण्याचे पूर्वीच मोगलांची कुमक
व केशवराव या दोहोंमध्यें वेबनाव होऊ
चालविलें व अर्काट, कांचीपुर वगैरे शहरे
१२००० स्वारांनिशीं अवरंगझेबानें पाठविलेल
पोंचला व मऱ्हाठे हटले. जो थोडाबहुत विज
कोंडेकरांचा मुलुख संभाजीनें बळकाविला होत
बुडाल्यानंतर अवरंगझेब रिकामा होतांच संभ

## १७—संभाजीच

जसजसा मुलुख हातून सुटून जाऊं
भाजीचा परिचय वृद्धिंगत होत चालल
टाकण्याचा आग्रही कलुशानें घातला
आला फाल्गुनमास" अशी स्थिती हे
हमेश बेहोश रहाण्याचें काम संभाजीनें

या वेळीं कोल्हापुरची फौजदारी
दिल्लीपति बहादुरगड मुक्कामीं होता

त्याचा जांवई अबुहुसेन गादीवर बसला. याच्
माजूं लागली. मादण्णास कारभार मिळाल्या
व्यवस्थितपणा कुतुबशाहीस आला होता.

---

## १६—संभाजीच्या सैरावैरां गद

छत्रपतीस एक शिवाजीसारखें धोरण असावें कि
परार्थ जन्मलेल्या मुत्सद्द्यांस तें असून छत्रपतीनें त्यां
संभाजी स्वतः धोरणाच्या गांवीं स्वप्नींही गेलेला
मुत्सद्दी होते, ते तर हत्तीच्या पायीं गेले किंवा विर
कारभार मिळाला होता, तो अति शहाणा कलुषा
शून्य होता. ठिकठिकाणीं अंतरा अंतरावर मुलुख
जड जातें, इतका जाडा या कुल कारभा
थोडें बहुत तरी लष्करी धोरण ठेव
शिवाजी हा महापुरुष या काळीं दि
व राजस्थानांतील रजपुतांस हातीं ध
कार देता. शहाजादा अकबर हात
इतकें काम होतें, ह्मणजे दक्षिणेंत खांसे
स एकदा सोडून दहादा नीट विचार
लोकोत्तर मुत्सद्दीपणा व हंबीररावांची शि
करण्याची ती लोकोत्तर हातोटी या दोहोंची
मंडळ जसें अकुतोभय होतें, तसेंच शहाज
रून कांपूं लागतें.

विजापुर बुडालें व कुतुबशाहीस बुडविण
रंगझेबाची स्वारी वळली, हें ऐकून संभाजी
करूं लागतो, व तिकडील गोंवळकोंडेकरांचा
णून चंदीच्या हरबाजी राजाकडेस केशवराव

मुळें, एके दिवशीं रात्रीं पन्हाळ्या
विशाळगडीं आला. पन्हाळ्या
ळगडीं खानजमान पोंचला,
कलुशा मंध्या करीत होता!
पडले नाहींत. खानजमान
तो पोंचतांच जयडिंम
चा हुकूम झुल्फिकारास केला.
या उभयतांस हुजुर पाठवि
मुसलमान झाल्यास जीवदान
रंगझेबानें दाखविली. "
होतों" अशा अर्थाचा उद्गार
ोडा मनापला. लगेच संभाजी
न चालविलें. यामुळें त्याची जीभ का
ल्या कानीना डोळे काढून, नंतर शिरच्छे
केला. या प्रमाणें हाल हाल होऊन शा
नाम संवत्सरे या वर्षी संभाजीचा शेवट आला